ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2022- Vol. 11 No. 2

# संत जनाबाईचे व्यक्तित्व : शोध आणि बोध

**प्रा. दिनेश न. गुजर**
*शरदचंद्र महाविद्यालय, बुटीबोरी*

**सारांश**
*पांडुरंगाप्रती असलेली निष्ठा आणि भक्तीमुळे संतजनाबाईचे स्थान संत मालिकेत उठून दिसतात. मात्र त्यांच्या वाट्याला उपेक्षिताचे जीवन आले. समाजव्यवस्थेच्या वाळवंटात तिचे जीवन पोळून निघाले. कर्तृत्ववान असूनही तिच्या वाट्याला एक स्त्री म्हणून जे जीवन आले ते तिच्यावर अन्याय करण्यासारखेच होते. 'नाम्याची दासी जनी' असे स्वतःला दासी म्हणवून घेत. पराक्रमी, कर्तबगार असूनही तिने आपले स्थान शूद्रांच्या सारखेच समजून घेत अस्पृश्यतेसारखे जीवन भोगले. अस्पृश्यतेसारखे जीवन भोगूनही या वाळवंटाच्या लेकीने आपल्या कर्तृत्वाने स्वतःचे स्थान सिद्ध केले. तिच्या अभंगातून आणि कृती उक्तीतून ती श्रेष्ठ असल्याचे अनेक दाखले तिने समाजासमोर ठेवले आहेत. संत जनाबाईचे वाङ्मयीन व्यक्तित्व भक्ती आणि पांडुरंगाप्रतीच्या एकनिष्ठ अविरत सेवेने सतत उजळले आहे. तिच्या अभंगातील भक्तीरस आणि माधुर्य याला तोड नाही. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, यांचा तिच्यावर प्रभाव असला तरी तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्व तिच्या वाङ्मयीन कर्तृत्वाने निश्चितच विलक्षण झाले आहे. व्यक्तिगत जीवनात भयंकर दुःख तिच्या वाट्याला आले असले तरी अत्यंत दर्जेदार अभंग रचनेतून ती 'संत वाटिकेतील जाईची वेल' तिला होता आले .*

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र ही संताची खाण! संत ज्ञानेश्वर, नामदेव तुकाराम, रामदास, एकनाथ, चोखामेळा, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, परिसा भागवत विसोबा खेचर, जोगा परमानंद, जगन्मित्र नागा असे अनेक पुरुष संत महाराष्ट्रात जन्मास आले. त्याशिवाय आद्यकवी राजयोगी मुकुंदराज, चक्रधर स्वामी, कलाकवी मुक्तेश्वर, पुढे वामनपंडित, सामराज, नागेश, विठ्ठल बिडकर, आनंदतनय, रघुनाथपंडित असे काही पंडित कवी तर कृष्णदयार्णव कवी श्रीधर, मन्वमुनीश्वर, अमृतराय, निरंजनमाधव आणि मोरोपंत असे कवी महाराष्ट्रात गाजलेत. शाहिरी वाङ्मयानी तर महाराष्ट्राच्या कला संस्कृतीला जपण्याचे कार्य केले. पोवाडे आणि लावण्यांनी एकेकाळी महाराष्ट्राची अस्मिता जागविण्याचे कार्य केले आहे. अनंतफंदी परशराम, रामजोशी, प्रभाकर, सगनभाऊ, होनाजी बाळा यासारख्या कवींनी पोवाडे आणि लावण्याच्या माध्यमातून लोकांच्या मनोरंजना सोबतच समाजप्रबोधन करण्याचे काम केले आहे. महाराष्ट्रात बखर वाङ्मयाला अतिशय महत्व आहे. महाराष्ट्रात राजे होऊन गेले. या राजांच्या काळात जे लेखन बातमी किंवा वृत्ताच्या स्वरूपात लिहिल्या जात होते त्याला बखर संबोधल्या गेले. शिवपूर्वकालीन बखरी, महिकावतीची बखर, राक्षसतागडीची बखर, शालीवाहनाची बखर, शिवकालीन बखरी, सभासदाची बखर, पेशवेकालीन बखरी, पानिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर, श्रीशाहूमहाराज यांची बखर अशा अनेक बखरीच्या माध्यमातून महाराष्ट्राचा ऐतिहासिक इतिहास लिहिल्या गेला आहे. एकूणच महाराष्ट्र ही संत, कवी शाहीर आणि राजांची भूमी आहे याचे असंख्य दाखले आपल्याला मिळतात. अशा गौरवशाली परंपरेच्या पार्श्वभूमीवर संतांचे स्थान अनन्य साधारण असून यातीलच स्त्रीवर्गातल्या संत जनाबाईचे व्यक्तित्व आणि कार्यकर्तृत्व स्त्रीवर्गाकरिता आदर्श असे आहे.

**संत जनाबाईच्या अभंगातील माधुर्य आणि भक्तीरस:**

संत जनाबाईचा अनेक संतांशी सहवास घडला. संत ज्ञानेश्वरांचाही तिच्यावर प्रभाव होता. चोखामेळा, बंकाजी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सावता माळी, हे सर्व जनाबाईचे समकालीन होते. संत रोहिदास चांभार जातीत जन्मला. त्याचाही गोडवा जनाबाई गाताना दिसते. चोखामेळ्याचे कर्तृत्व तिला माहीत होते. तो जरी महार जातीत जन्माला आला तरीही त्याच्या अफाट कर्तृत्वाची तिला जाणीव होती., चोखामेळ्याची महत्ती गाताना ती म्हणते –

*"यातिहीन चोखामेळा I त्यासी भक्तांचा कळवळा III*

*त्याचा जाला म्हणीयारा I राहे घरी धरी थारा III*
*देव बाटविला त्यानं I हासे जनी गाय गाणे" III*

चोखामेळ्याच्या वाट्याला आलेली अस्पृश्यता बघून जनाबाईला हसायला येते. माणसाच्या स्पर्शाने देव कसा बाटू शकतो, हे न उकलणारे कोडे जनाबाईला त्रस्त करते ज्ञानेश्वरांची महती गाताना ती म्हणते -

*"ज्ञानाचा सागर I सखा माझा ज्ञानेश्वर II*
*मरोनिया जावे I माझ्या पोटा यावे II*
*ऐसे करी माझ्या भावा I सख्या माझ्या ज्ञानदेवा II*
*जावे ओवाळुनि I जन्मोजन्मी दासी जणी II"*

या अभंगातून ज्ञानेश्वराप्रती तिच्या मनात असलेली श्रद्धा आणि भक्तीभाव आपल्याला पाहावयास मिळत. ज्यांच्या ज्यांच्यावर समाजव्यवस्थेत अन्याय झाला. ते सर्व संत जनाबाईला जवळचे वाटतात. त्यांचा ती मनापासून गोडवा गाताना दिसते .

'विठ्ठल अर्थात 'पांडुरंग' हा जनाबाईचा देव आहे. आपल्या लेकुरवाळ्या पांडुरंगाचे वर्णन करतांना ती म्हणते "

*"विठू माझा लेकुरवाळा I संगे लेकुरांचा मेळा II*
*निवृत्तीनाथ खांद्यावरी I सोपानाचा हात धरी II*
*पुढे चाले ज्ञानेश्वर I मागे मुक्ताई सुंदर II*
*गोरा कुंभार मांडीवरी I चोखा जीवा बरोबरी II*
*बंका कडियेवरी I नामा करांगुळी धरी II*
*जनी म्हणे गोपाळा I करी भक्ताचा सोहळा II"*

अशा पद्धतीने बहुजन समाजातील संतांची विठ्ठलाप्रती असलेली भक्ती आणि त्यांचे स्थान जनाबाईने आपल्या अभंगातून व्यक्त केले आहे. जनाबाईने लौकिक जीवनात जे अनुभव घेतले तेच आपल्या अभंगातून मांडले. कुठे शाळेत जाऊन न शिकता ती समाजाच्या शाळेत शिकली. जे काही तिच्या वाट्याला आले. ते तिने प्रामाणिकपणे आपल्या अभंगातून मांडले. आपल्या व्यथा आणि दुःख मांडले. ती आपल्या जीवनात दुःखी वाटते तिचे अंतर्मन फक्त पांडुरंगच समजून घेतो. या भावनेपोटी ती रात्रंदिवस पांडुरंगाचा धावा करते. तिचे सारेच जीवन अभ्यासले तरी ती वाळवंटाची लेक वाटते. अशी ही वाळवंटाची लेक आपल्या गंगाखेड या गावी जाऊन समाधी घेतल्याचे इतिहासात आढळते. नाम्याची दासी म्हणून जगणारी जनाबाई आपल्या अभंगाच्या रचनेमुळे आणि पांडुरंगाच्या भक्तीमुळे श्रेष्ठ संत ठरली. मात्र तिचे व्यक्तिगत जीवन अत्यंत दुःखाने भरले होते.

"माझे जनीला नाही कोणी म्हणून देव घाली पाणी"

अशा अभंगातून तिचे एकटेपण पाहावयास मिळते. तिच्यावर खऱ्या अर्थाने अन्यायच झाला. अत्यंत कर्तृत्ववान ही स्त्री ! मात्र ती दासी बनूनच आपले जीवन व्यतीत करते. निष्पाप निराधार असणारी जनाबाई तिच्या जीवनाबाबत कुणाला दोष देत नाही. परंतु तिच्या वेदना विठ्ठलापाशी मांडतांना तिच्या अभंगातून तिचे दुर्दैवी जीवन आपल्याला अनुभवता येते. कुठल्या शाळेत न शिकणारी जनाबाई अत्यंत दर्जेदार अभंग रचून आपली भक्ती व्यक्त करते. संतवाटिकेतील जाईची वेल असे जिचे वर्णन केले जाते त्या जनाबाईचे जीवन मात्र दुःखाने भरलेले पाहावयास मिळते. राजा ढाले यांनी जनाबाईला सर्व प्रथम वाळवंटाची लेक संबोधले आहे. संत जनाबाई ही चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील शूद्र या शेवटच्या वर्णातील नसून ती अतिशूद्र असावी असा ढाले शोध लावतात. राजाई ही नामदेवाची पत्नी तर गोणाई त्याची आई असून संत नामदेवांचे कुटुंब हे शिंपी जातीतील असल्यामुळे ते बहुजन होते मग जनाबाई आपल्याला 'नीच समजून बाहेरी म्हणजे दाराबाहेर ठेवल्याचे का सांगते.? असा प्रश्न ढाल्याना पडतो. नामदेवानेही आपल्या अभंगात जनाबाईविषयीचे कर्तृत्व मांडले नाही. ढाल्यानी "गोपाळपुरा" या पंढरपूरहून ५ कि मी अंतरावर असलेल्या टेकडीवजा जागेत असलेल्या अस्पृश्यांच्या वस्तीशी जनाबाईचे नाते जोडले आहे." संत जनाबाई ही संत नामदेवाच्या घरी कामापुरती जात असे. पण ती राहत असे गोपाळपुरा नावाच्या अस्पृश्यांच्या गावाबाहेरील वसाहतीत".[१] एवढ्यावरच ढाले थांबत नाहीत. याबाबतीत काही ऐतिहासिक ग्रंथातले दाखले उद्धृत करून जनाबाई ही 'महार' जातीत जन्माला आली असावी असा ते निष्कर्ष काढतात. जिचे समग्र आयुष्यच पंढरपुरात गेले तिचे समाधी स्थळ पंढरपुरात का नाही व असा प्रश्न ढाल्यांना पडतो. ढाल्यांच्या मताचा परामश घेताना डॉ. सुरेश खोब्रागडे म्हणतात, "ढाले 'गोपाळपुरा' या अस्पुरश्यांच्या वस्तीचा बारकाईने तपास करतात 'Gazetteer of the Bombay presidency 'या ग्रंथाचा २४ वा खंड ढाल्यांना बरीच माहिती पुरवितो. या ग्रंथात एक उतारा आहे. 'Gopal 's Literary

cowkeepers are returned as numbering fiftySix & found wandering over the state. They are mahar beggers who wear a woolen necklace, strike cymbals and ask blessing on the almsgiver. Though mahar by birth and in social customres they do not eat from mahar."[२] स्वतःला गोपाळ म्हणवून घेणारे महार, उर्वरित महारांच्या हातचे अन्न का सेवन करीत नसावेत असा प्रश्न ढाल्यांना पडतो. ढाले

मग 'The mahars : Who were they and how they become The untouchable?' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या शोध निबंधाचा आधार घेतात. जनाबाई ही ज्ञानेश्वरांच्याही आधी जन्मलेले महार जमातीतील पहिली कवयित्री असल्याचे राजा ढाले सांगतात .ते म्हणतात "ती वयाने ज्ञानदेवापेक्षा वडील ठरते आणि ज्ञानदेव हा ज्ञानेश्वराहून वयाने वडील ठरतो .अशा तऱ्हेने मराठी संत साहित्यातील ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतील परंतु त्याच्याही आधी जन्मलेली म्हणून सर्वात ज्येष्ठ कवयित्री ठरते आणि तिची ही संत साहित्यातील प्रभावळ तिच्याजवळच थांबत नाही जर तिच्या समकालीन असलेले चोखामेळ्याचे अख्खे कुटुंब त्यात ओढले जाते आणि ही लांबड 'भागी माहेरी' पर्यंत घेऊन ठेपते"[३] अशाप्रकारे संत जनाबाईच्या इतिहासाविषयी काही माहिती सापडते. अजूनही तिच्या जीवनाविषयीचे स्पष्ट आकलन होत नाही मात्र जीवन दुःखाने वेदनेने ओथंबलेले असून विठ्ठल भक्तीतच तिचे अख्खे आयुष्य गेल्याचे दिसून येते. ती खऱ्या अर्थाने शोषित ,पीडित आणि वंचित असल्याचे तिच्या एकूणच व्यक्तिरेखेवरून आपल्या लक्षात येते.

**समारोप :-**

महाराष्ट्रात पुरुष संत जसे प्रसिद्ध झाले तशाच स्त्री संतांचा सुद्धा समृद्ध असा इतिहास पाहावयास मिळतो. या स्त्री संतांमध्ये संत ज्ञानेश्वरांची धाकटी बहीण मुक्ताबाई, नामदेवाच्या कुटुंबात वाढलेल्या संत जनाबाई, संत तुकारामाच्या शिष्या बहिणाबाई, संत रामदासांच्या शिष्या वेणाबाई, संत कान्होप्रात्रा तसेच गोरक्षनाथ शिष्य राजा भर्तृहरीची शिष्या मुक्तादेवी, स्वामी चक्रधारांची पत्नी कामाईसा, त्यांचीच पट्टशिष्या आणि मराठीतील पहिली कवयित्री महादाईसा उर्फ रूपाईसा, व नागदेवाची नात नागांबिका, संत नामदेवाची आई गोणाई, त्याची पुतणी नागरी, नामदेवाची पत्नी राजाई, संत चोखाबाईची पत्नी सोयराबाई, चोखोबाची बहीण निर्मला, गोदा तटावरची भक्त प्रेमाबाई, बयाबाई, अंबिकाबाई,चिंदबरम शिष्या विठाबाई अशा अनेक स्त्रियांनी आपल्या भक्तिरचनेतून स्वतःचे कवित्व आणि संतत्व सिद्ध केले आहे .आध्यात्मिक आणि पारमार्थिक श्रेत्रात त्यांच्या कार्याचा ठसा उमटलेला असून आपल्या अमोघ वाणीतून आणि जनप्रबोधनातून महाराष्ट्राला सुसंस्कृत करण्याचे त्यांचे कार्य निश्चितच दखलपात्र असे आहे. या सर्व स्त्री संतमालिकेत जनाबाईचे स्थान अन्य साधारण असे आहे. पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन असलेल्या संत जनाबाईने आपल्या अभंग रचनेतून आपली भक्ती वेळोवेळी महाराष्ट्राला दाखून दिली आहे.

*"पाय जोडुनी विटेवरी I कर ठेवुनी कटेवरी II १ II*
*रूप सावळे सुंदर I कानी कुंडले मकराकार II २ II*
*गळा वैजयंती माळा I तो हा मदनाचा पुतळा II ३ II*
*गरुड सन्मुख उभा I जनी म्हणे धन्य शोभा II ४ II*

**निष्कर्ष:**

१) स्वतः कर्तृत्वशाली महिला असूनही संत जनाबाईने "नामयाची दासी" म्हणून जीवन जागून स्वतःच्या साधेपणा आणि नम्रपणा दाखवून दिला आहे.
२) विठ्ठलावर जनाबाईची निस्सीम भक्ती असून निस्वार्थपणा तिच्या व्यक्तित्वात स्पष्ट दिसून येतो.
३) आध्यात्मिक क्षेत्रात जनाबाईने केलेल्या कार्याचा मोठेपणा संत नामदेवासह इतरही संतमंडळींना मान्य आहे.
४) जनाबाईच्या अभंगातून भक्तीरस ओतप्रोत वाहतांना दिसतो. माधुर्य, ओजोगुणाचे सुरेख संगम त्यांच्या एकूणच अभंगातूनच जाणवते.
५) पांडुरंग जनाबाईच्या हाकेला ओ देत नसतानाही जनाबाईच्या अभंगात विद्रोह येत नाही .

**संदर्भ टिपा**

1) गंगाधर पानतावणे (संपा) 'अस्मितादर्श' वार्षिक विशेषांक - २००९, वर्ष ४२, अंक - ३, पृष्ठ -३७
2) डॉ. सुरेश खोब्रागडे - "राजा ढाले यांच्या समग्र वाङमयाचा चिकित्सक अभ्यास", २०१२, पृष्ठ – २२४
3) उनि 'अस्मितादर्श', पृ – ४०.